B.Sc. First Year / B.com. / B.Sc. (Information Technology) / B.C.A. New CBCS Pattern Semester-I

**UCA1F01M / UBITT102.2 / UBCAT102.2 - Compulsory Marathi**

P. Pages : 2 **GUG/S/25/10634C**

Time : Three Hours Max. Marks : 80

---

**1.** 'विज्ञानयुगात भारत' या पाठातून विज्ञान युगाचे महत्त्व जयंत नारळीकर यांनी कसे प्रतिपादन केले? सविस्तर सांगा. **15**

**किंवा**

कचरू गिऱ्हे यांच्या 'भटक्या' या आत्मकथनातून त्यांच्या वाट्याला आलेला संघर्ष विशद करा?

**2.** 'विद्यार्थ्याप्रत' या केशवसुतांच्या कवितेचे रसग्रहण करा? **15**

**किंवा**

कवी बा. सी. मर्ढेकर यांनी 'भंगु दे काठिण्य माझे' या कवितेतून कोणते मागणे मागितले आहे?

**3.** पुढीलपैकी **कोणत्याही एकाच** गटातील उत्तरे सुमारे शंभर शब्दात लिहा. **15**

**गट-'अ'**

क) 'भातृभावाचे तत्त्व सर्वांनी मान्य केले पाहिजे' असे डॉ. आंबेडकर का म्हणतात?

ख) 'विद्या हे सर्वात मोठे धन आहे' असे गाडगेबाबा का म्हणतात?

ग) 'जग सुंदर असतं' या विधानावर लेखक खदखदून का हसले?

**किंवा**

**गट-'ब'**

च) गाडगेबाबांच्या कीर्तनशैलीचा परिचय करून द्या.

छ) 'माणसांनी, वाहनांनी इमारतींनी गच्च भरलेल्या शहरात मी एकटाच आहे' असे लेखकाला का वाटते?

ज) डॉ. आंबेडकर यांच्या मते, भारतीय लोकशाहीला प्रमुख धोके कोणते?

**4.** पुढील **कोणत्याही एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी शंभर शब्दात लिहा. **15**

**गट-'क'**

त) पसायदानात ज्ञानेश्वरांनी परमेश्वराकडे कोणती मागणी केली?

थ) 'स्वप्नांची समाप्ती' या कवितेतून पहाटेचे सौंदर्य अधोरेखित करा?

द) लेखणीच्या तलवारीने वार करणे शिका, असे कवयित्री कोणाला उदद्देशून व का म्हणते?

**किंवा**

**गट-‘ड’**

प) ‘आमचे रक्त का सळसळत नाही’ असा प्रश्न कवयित्री उषाकिरण आत्राम का विचारतात?

फ) ध्येय, प्रेम, आशा यांची होतसे का कधी पूर्ती… असे कवी कुसुमाग्रज का म्हणतात?

ब) ज्ञानेश्वरांनी संत महिमा कसा वर्णन केला?

**5.** अ) पुढीलपैकी **कोणत्याही एकाच** गटातील उत्तरे प्रत्येकी सुमारे शंभर शब्दात लिहा. **10**

**गट-‘च’**

1) भाषणात किंवा बोलण्यात उच्चारणाला कसे महत्त्व असते ते सांगा?

2) भाषा आणि व्याकरण यांचा संबंध स्पष्ट करा?

**किंवा**

**गट-‘छ’**

1) आभार प्रदर्शन करतांना कोणते संकेत पाळावे?

2) भाषेची अभिव्यक्ती कशा प्रकारे होते? ते थोडक्यात स्पष्ट करा.

ब) पुढीलपैकी **कोणतेही पाच** प्रश्न सोडवा. **10**

1) स्वराचे प्रकार सांगा?

2) भाषेचे महत्त्व थोडक्यात स्पष्ट करा?

3) श्रवण म्हणजे काय?

4) मातृभाषा म्हणजे काय?

5) वाचन म्हणजे काय स्पष्ट करा?

6) मराठीतील वर्णविचार स्पष्ट करा.

7) महाप्राण कशाला म्हणतात?

*************